पुणे जिल्हा परिषद पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र.शिक्षण/माध्य-८/नैवा/ 2238 /१०
पुणे दिनांक 20/८/२०१०

प्रति,

मुख्याध्यापक,
ज्ञानप्रबोधिनी माध्यमिक व कनि.महाविद्यालय,
ससाणेनगर, पुणे-२८

**विषय** - इ.५ वी ते ७ वी चे वर्ग प्राथमिक विभागाकडुन माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यास परवानगी देणेबाबत

**संदर्भ** - मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र जा.क्र.माध्य-३/ (१५) ५ ते ७ / पुवि/२००९-१०/१३७०६/०९ दिनांक २४/६/२०१०

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, १९९१-९२ या शैक्षणिक वर्षापासुन परवानगी दिलेल्या नविन माध्यमिक शाळांना ५ वी ते ७वीचे वर्ग नव्याने सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचे शासनाचे पत्र क्रमांक एस.एस.एन.१०९७/५२८/९९/माशि-१ दि.१/३/१९९९ व शासन निर्णय क्र.एस.एस.एन.१००२/२५६/०२ माशि-१ दि.२७/६/२००३ चे शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी आपले विदयालयास सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासुन इ.५ वी ते ७ वीचे वर्ग प्राथमिक विभागाकडुन माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार या कार्यालचीही परवानगी खालील अटीवर देण्यात येत आहे.

१. इ.५ वी ते ७ वीचे वर्ग भविष्यामध्ये प्राथमिक शाळेस मंजूर केले जाणार नाहीत.
२. माध्यमिक शाळा संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश / नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.
४. प्राथमिक विभागाकडील मंजूर शिक्षक संख्या वर्ग माध्यमिक विभागाकडे वर्ग केल्यानंतर तीच राहील. जादा शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी मंजूर केले जाणार नाहीत.

वरील अटीवर आपले विदयालयास इ.५ ते ७ चे वर्ग प्राथमिक विभागाकडुन माध्यमिक विभागाकडे वर्ग करण्यास परवानगी देण्यात येत आहे. सदरप्रमाणे आपण सेवकसंच निश्चिती करुन घ्यावी.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे.

**प्रत** - मा.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सादर.